दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (चोंडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १५८ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## ही मशाल फक्त पेटली नाही...ती सरकारच्या वाऱ्यालाच भिडली!

# बच्चू कडूंचं नाशिकमधून थेट सरकारला आव्हान

# शेतकऱ्यासाठी ‘कायदा’ नसेल तर मंत्रालय पेटवू!

नाशिक (प्रतिनिधी); शासनाच्या फाइलांमध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांच्या भविष्याला आता मशालीचा मार्ग सापडतोय! कर्जमाफी, हमीभाव, सातबारा कोरा या मूलभूत हक्कांसाठी गुरुवारी रात्री नाशिक येथे राज्याचे माजी मंत्री व प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू कडू यांनी कृषीमंत्री मानीकराव कोकाटे यांच्या निवासस्थानासमोर धगधगती मशाल आंदोलन छेडलं.हा केवळ निषेध नव्हता, हा इशारा होता शेतकऱ्यांच्या मागण्या वेळोवेळी दुर्लक्षित केल्याच्या पार्श्वभूमीवर उभं राहिलेलं हे आंदोलन आता पुढील १५ दिवसांत सरकारची दिशा ठरवणार आहे.

### शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र संविधान लिहू का?–कडूंचा स्फोट

गेल्या कित्येक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या वेदना आम्ही ऐकतोय पण शासन केवळ तात्पुरत्या सवलती देत राहतंय. उद्योगपतींसाठी विशेष कायदे होतात, मग शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र संविधान लिहायचं का आम्ही? असा संतप्त सवाल कडूंनी विचारला.

### कोकाटे ‘घरी’ नव्हते पण आग घरात पोहोचली!

आंदोलनावेळी कृषीमंत्री मानीकराव कोकाटे निवासस्थानी अनुपस्थित होते. मात्र आंदोलनाच्या तीव्रतेनंतर त्यांनी स्वत: बच्चू कडूंशी संपर्क साधत त्यांना सिन्नर तालुक्यातील सोमठाणे येथे चर्चेसाठी पाचारण केलं. येत्या काही दिवसांत दोघांमध्ये प्रत्यक्ष चर्चा होणार आहे.

### १५ दिवसांचा अल्टिमेटम : नंतर मंत्रालयासमोर ठिणग्या!

ही मशाल जर घरासमोर पेटू शकते, तर मंत्रालयही अपवाद ठरणार नाही. सरकारने १५ दिवसांत निर्णय घ्यावा. अन्यथा, मंत्रालयासमोर अनिश्चितकालीन आंदोलन उभारण्यात येईल, असा थेट इशारा बच्चू कडूंनी दिला आहे.

### ‘राजकीय नौटंकी’ नव्हे, तर जनतेचा आक्रोश!

यावेळी विविध तालुक्यांतून आलेले शेतकरी, युवक, महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मशालींनी केवळ अंधार फोडला नाही, तर राज्यकर्त्यांच्या अश्रद्धेवर प्रकाश टाकला. हे आंदोलन एकट्या कडूंचं नाही, ही जनतेची जळती वेदना आहे, असा सूर उपस्थित शेतकऱ्यांनी लावला.





शेतकऱ्यांच्या हक्कांवर प्रकाश टाकणारी ही मशाल, शासनाच्या दुर्लक्षावर विचार करायला भाग पाडणारी ठरावी. कडूंचा आवाज कितीही तीव्र असला, तरी त्यात केवळ आंदोलन नाही – तर समाधानाची आस आहे. ही मशाल सरकारने जर वेळेत ओवाळली नाही, तर ती ठिणगी उद्या सर्वदूर पेटेल, याची जाणीव सत्ताधाऱ्यांनी ठेवावी!

## एसटी महामंडळ अध्यक्षपदी प्रताप सरनाईक यांची निवड

### लाडू वाटप करून युवासेनेचा आनंदोत्सव



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रताप सरनाईक यांची राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने संपूर्ण राज्यभरात उत्साहाचे वातावरण आहे. युवासेना जिल्हाप्रमुख शैलेश केलझरकर यांच्या मार्गदर्शनात आणि महानगरप्रमुख पवन यादव यांच्या नेतृत्वात चंद्रपूर एसटी बसस्थानक येथे लाडू वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी वैद्यकीय जिल्हा प्रमुख चेतन उजवणे, बल्लारपूर तालुका प्रमुख चंदन त्रिलोकांनी, शिवसेना नेते उमेश कुंडले, अमोल गेडाम तसेच अनेक युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरनाईक यांच्या नियुक्तीमुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णय होतील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## एक माया संपली, एक बालपण हरवलं; आजी नातवाची अंत्ययात्रा

**रायगड । ज्ञानेश्वर वाणी**

रोहा शहराने ९ एप्रिल रोजी अशी घटना अनुभवली, जी केवळ दुर्घटना नव्हे तर काळजाला चीरून टाकणारा भावनिक आघात होती. ओम चेंबर्स या इमारतीच्या टेरेसवरून उडी घेत आजीने आपल्या एकाच वर्षाच्या नातवासह जीवन संपवलं. एकाच क्षणात मायेचा सावलीही हरपली आणि निष्पाप बालपणही अंधारात गडप झालं. उर्मिला सिद्धीराज कोरे (वय ५१) या आजीने आपल्या नातू वेदांत भोगडे याच्यासह इमारतीच्या टेरेसवरून खाली झेप घेतली. या वेदनादायक घटनेत उर्मिला कोरे यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या चिमुकल्याला तातडीने पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात नेत असतानाच त्यानेही श्वास सोडला.आजीनं नातवासोबत मृत्यू का निवडला? हाच प्रश्न संपूर्ण शहरात गुंजत आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, उर्मिला कोरे या काही काळापासून मानसिक तणावात होत्या. वेळेवर औषधं न घेतल्यामुळे त्यांचा आजार अधिक गंभीर झाला होता. याच मानसिक तडफडीमधून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं, असा अंदाज व्यक्त करण्यात येतो.पोलिस तपास सुरु असून आत्महत्येचं नेमकं कारण अजून स्पष्ट



झालेलं नाही. मात्र एक गोष्ट नक्की – ही घटना केवळ आकडेवारी नाही, ही आहे एका आजीच्या मायेची वेदना आणि एका चिमुकल्याच्या हरवलेल्या भविष्याची कहाणी.आज रोहाच्या रस्त्यांवर फक्त पावलं नव्हती, तर डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी मन भारावून गेलं होतं. शोकाकुल वातावरणात आजी–नातवाची अंत्ययात्रा निघाली. एक माया संपली, एक बालपण हरवलं – याहून अधिक हृदयद्रावक वास्तव काय असू शकेल?

## वर्धा जिल्हा गुंतवणूक परिषदेत १२४७ कोटींचे ४७ सामंजस्य करार

### ३३१४ युवकांना रोजगार




**वर्धा । प्रतिनिधी**

उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढवून रोजगारनिर्मितीस चालना देण्यासाठी आयोजित वर्धा जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत मेटल, ऑटोमोबाईल, जिनिंग–प्रेसिंग युनिट, हॉटेलिंग आदी विविध क्षेत्रातील कंपन्यांशी एकूण ४७ सामंजस्य करार (चेण) करण्यात आले. यामुळे जिल्ह्यात १२४७ कोटींची गुंतवणूक होणार असून ३३१४ युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

वर्धा जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ मिळावे यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने गुंतवणूक परिषद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत मेटल, ऑटोमोबाईल, जिनिंग–प्रेसिंग युनिट्स, हॉटेलिंग यासह विविध उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.यावेळी झालेल्या ४७ सामंजस्य करारांद्वारे एकूण १२४७ कोटी रुपयांची गुंतवणूक जिल्ह्यात येणार आहे. या गुंतवणुकीतून एकूण ३३१४ स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यामुळे वर्धा जिल्ह्याच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला मोठा चालना मिळणार आहे.या उपक्रमामुळे जिल्हा स्तरावर व्यावसायिक वातावरण निर्माण होऊन नवउद्योजकांना देखील प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# कर्जमाफीसाठी मशाल झाली हत्यार

# वरोऱ्यात प्रहार कार्यकर्त्यांचा एल्गार

## प्रहार कार्यकर्त्यांचा आक्रोश, पोलिसांचा चोख बंदोबस्त

वरोरा (आशिष घुमे): निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, पेरणी ते कापणीपर्यंतचा खर्च मनरेगामधून देणे आणि दिव्यांग बांधवांना मासिक ६,००० हजार मानधन देण्याची आश्वासने दिल्यानंतर सत्तेत आलेल्या सरकारने ती पाळली नसल्याने प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गुरुवारी रात्री वरोऱ्यात आमदार करण संजय देवतळे यांच्या निवासस्थानासमोर तीव्र मशाल आंदोलन छेडले.रात्री ९ वाजता आनंदवन चौकात कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले. ’कर्जमाफी द्या’, ’मानधन द्या’, ’आमचा हक्क मिळवून द्या’ अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. कार्यकर्ते मशाली घेऊन आमदार निवासस्थानाकडे कूच करताच पोलिसांनी आनंदवन चौकातच त्यांना अडवले. आंदोलकांच्या विनंतीनंतर शिष्टमंडळाला आमदार निवासस्थानाकडे जाण्याची परवानगी देण्यात आली. मात्र, आमदार देवतळे उपस्थित नसल्याने त्यांच्या स्वीय सहाय्यकांनी निवेदन स्वीकारले. त्यानंतर सर्व आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.




ही आंदोलनाची तारीखही विशेष होती – ११ एप्रिल. महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती आणि दोन दिवसांनंतर येणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती या पार्श्वभूमीवर निळा दुपट्टा आणि भगवा झेंडा हाती घेऊन प्रहार कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. शेतकऱ्यांच्या वेदना, वाढती महागाई, दिव्यांग बांधवांचे हाल आणि शासनाच्या दुर्लक्षावर संताप व्यक्त करत त्यांनी आंदोलनात सहभाग नोंदवला. या आंदोलनाचे नेतृत्व प्रहारचे जिल्हा प्रमुख शेरखान पठाण यांनी केले. त्यांच्यासोबत उपजिल्हा प्रमुख आशिष रणदिवे, गणेश उराडे, अक्षय बोदगुलवार, आकाश नाकाडे, बालाजी खिरटकर, आकाश झाडे, अमोल दातारकर, अमोल काळे, राकेश भुतकर, संदीप चौधरी, नंदकिशोर डाखरे, जगदीश पैदाम, प्रशांत भोयर आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.महिलांचीही लक्षणीय उपस्थिती आंदोलनात दिसून आली. गीता फुलकर, वंदना वाढई, राजिया पठाण, शिंधुताई मडावी, रंजना सोनुने, पायल घोडमारे या महिला कार्यकर्त्यांनी जोरदार सहभाग नोंदवत संघर्षात आपली उपस्थिती नोंदवली.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता पोलिसांनी सायंकाळपासूनच कडक बंदोबस्त तैनात केला होता. ठाणेदार पोलीस निरीक्षक अजिंक्य तांबोडे स्वत: बंदोबस्तात उपस्थित होते. आनंदवन चौक ते आमदार निवासस्थानापर्यंत पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवत शांतता राखण्याचे प्रयत्न केले.

### लवकर निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

प्रहार जनशक्ती पक्षाने स्पष्ट इशारा दिला आहे की, शासनाने दिलेल्या आश्वासनांवर त्वरित कार्यवाही न केल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. निवडणुकीत जनतेला गोड स्वप्न दाखवून सत्तेवर आलेल्या सरकारने आता त्यांची जबाबदारी पार पाडावी, अन्यथा रस्त्यावरचा संघर्ष उग्र होईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

# लोणी हनुमान मंदीराची गौरवशाली ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि अध्यात्मिक महिमा

जळगावपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर असलेल्या लोणी हनुमान या ठिकाणी वसलेले श्री हनुमान मंदीर हे महाराष्ट्रातील एक प्राचीन व अत्यंत श्रद्धास्थान मानले जाते. अवचित हनुमान या नावाने प्रसिद्ध असलेले हे मंदिर पूर्वी ‘‘मत्याणे‘‘ नावाच्या गावात होते. या ठिकाणी पूर्वीपासूनच सर्व जाती-धर्मांचे लोक वास्तव्य करत होते, आणि शेती व पशुपालन हा प्रमुख व्यवसाय होता.

गावाजवळ असलेल्या जंगलात एक जुना वडाचा झाड होता. गावातील गवळ्यांचे जेव्हा तिथे विश्रांतीदरम्यान झोप लागत असे, तेव्हा त्यापैकी एका गवळ्याला स्वप्नात श्री हनुमानजींचे दर्शन झाले. त्यांनी सांगितले की, ‘‘मी या गावाचा उद्धार करण्यासाठी येथे येणार आहे. येथेच माझी मूर्ती आहे, ती शोधून मंदिरात स्थापित करा.‘‘ या स्वप्नाच्या आधारे गावकऱ्यांनी खुदाई सुरू केली, परंतु त्या वेळीचे जमीनदार यांनी ती थांबवून दिली.पण त्यांनाही रात्री हनुमानजींचे स्वप्न आले आणि दुसऱ्या दिवशी खुदाई करताच एक अत्यंत सुंदर हनुमान मूर्ती सापडली. त्यानंतर त्या मूर्तीची विधीवत स्थापना करून पूजा-अर्चा सुरू झाली.विशेष म्हणजे, एका गवळ्याने हनुमानजींना लोणी (माखन) अर्पण करण्याची मन्नत मागितली होती. त्याच्या मन्नतीचा चमत्कार असा दिसून आला की, ज्या घरात त्याने लोणी ठेवले होते, त्या घराला आग लागली पण ते लोणी व ते अडकवलेली दोरी मात्र जळली नाही. तेव्हापासून या मंदिरात लोणी अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली.काळानुसार गावातील धर्मकांडा वाढत गेल्याने लोक गाव सोडून गेले. त्यानंतर ही जागा ओसाड झाली. अनेक वर्षांनंतर, स्वामी श्री माधवदासजी महाराज, जे गुजरातच्या वडोद्रा येथील हनुमान आश्रमाचे महंत विष्णुदासजी महाराज यांचे शिष्य होते, त्यांनी येथे येऊन मंदिराचे पुनरुज्जीवन केले. खुदाई दरम्यान मंदिराच्या तीन वेगवेगळ्या युगातील नीव सापडल्यामुळे मंदिराचे ऐतिहासिक महत्व अधोरेखित होते.आजही या मंदिरात माखनाची बनवलेली मूर्ती असून, मूळ मूर्ती मंदिराखाली असलेल्या गुहेत विराजमान आहे. भक्त आपल्या श्रद्धेनुसार मूर्तीला लोणी आणि सिंदूर अर्पण करतात, जे वितळत नाहीत. मंदिराच्या डाव्या बाजूला एक प्राचीन शिवमंदिर आहे. तसेच, मंदिराच्या मागे भजनपुरी महाराज यांची समाधी आहे, जे कंदीलवाले महाराज म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या दिव्य दर्शनाचा अनुभव आजही एकादशीच्या रात्री भक्त घेतात.या मंदिरात दर शनिवारी पाच वेळा दर्शन घेणाऱ्यांच्या मनोकामना पूर्ण होतात, असे मानले जाते. हनुमान जयंती निमित्त येथे छप्पन भोग चा कार्यक्रम होतो आणि हजारो भक्तगण दर्शनासाठी गर्दी करतात. मंदिराच्या वतीने यात्रेकरूंना पिण्याचे पाणी, सामूहिक भोजनासाठी भांडी व अन्य सुविधा देण्यात आलेल्या आहेत. जळगावहून थेट बस सेवा देखील उपलब्ध आहे.सध्या येथे सिद्धीपीठ महंत १०८ श्री दीपकदास जी महाराज हे सेवा करत आहेत आणि भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणाऱ्या अवचित हनुमानजी ची कीर्ती केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात व परदेशातही पोहोचली आहे.

**-भुषण सेंदाने**



# क्रांतीच्या उंबरठ्यावर पेटलेल्या मशाली!

शासनाच्या दुर्लक्षाच्या अंधारात शेतकऱ्यांची मशाल प्रकाशाचा एकमेव पर्याय ठरत आहे. नाशिकमध्ये कृषीमंत्री मानीकराव कोकाटे यांच्या घरासमोर जेव्हा शेतकरी नेता बच्चू कडू यांच्या नेतृत्वात मशाल आंदोलन झालं, तेव्हा ती केवळ विरोधाची साद नव्हती. ती होती आक्रोशाची ठिणगी, जी एका नव्या उद्रेकाचा इशारा होती. अंधारात जेव्हा शासन डोळे झाकून बसतं, तेव्हा लोकांनी पेटवलेली मशालच एकमात्र उत्तर असतं. हे आंदोलन 'निषेध' या संज्ञेपलीकडे जाऊन एक सशक्त संकेत ठरत आहे, शेतकरी आता शांत नाही, सहनशीलतेची सीमा पार झाली आहे, आणि त्याचं रूपांतर आता धगधगत्या चेतनेत झालं आहे.



शेतकरी वर्षानुवर्षं हमीभावाच्या प्रतीक्षेत आहे. पिकाच्या उत्पादन खर्चावर आधारित दराचे फसवे वायदे, कधीही न मिळणाऱ्या कर्जमाफ्या, विम्याच्या नावावर लुटणाऱ्या खासगी कंपन्या, आणि सरकारकडून होणारी फक्त आकड्यांची खेळखंडोळ ही त्यांच्या जीवनाची रोजची तडफड बनली आहे. आणि याच सगळ्याच्या पार्श्वभूमीवर, जेव्हा कृषीमंत्र्यांच्या घरासमोर मशाली पेटतात, तेव्हा त्या प्रश्न विचारत नाहीत, त्या उत्तरं मागतात. आणि हे उत्तर सरकारला द्यावंच लागणार आहे, कारण ही मशाल केवळ हातातल्या काठीवरचा जळणारा कापूस नाही, ती आहे लोकशाहीच्या रक्षणासाठी पेटलेली आक्रोशाची ज्वाळा.

बच्चू कडूंचं नेतृत्व वेगळं आहे. त्यांच्या आंदोलनात फक्त भाषणं नसतात, तिथं भावना असतात. त्यांनी निवडलेली मशाल ही 'कॅमेरा फ्रेंडली स्टंट' नाही, ती एका संघर्षशील मानसिकतेचा आरसा आहे. ते सरकारला सांगत आहेत की, ‘तुम्ही थांबला आहात, पण शेतकरी थांबणार नाही.’ या आंदोलनामागे एखादी संघटना नाही, तर एका संपूर्ण शोषित वर्गाचा जीव ओतलेला आहे. शेतकरी फक्त पीक पिकवत नाही, तो देशाला जगवत असतो. आणि ज्याला अन्नधान्य देतो, त्यालाच जर हमीभाव देणं सरकारला जमत नसेल, तर ही व्यवस्था कुणाच्या हिताची?

आज राज्य सरकार आपल्या प्रचारकी यंत्रणेत मशगूल आहे. कृषीमंत्री असोत वा मुख्यमंत्री, प्रत्येक जण एखाद्या घोषणांचा पुलिंदा घेऊन फिरतो. पण जमिनीवर बदल काहीच नाही. विमा कंपन्यांचे मनमानी नियम, बियाण्यांची गुणवत्ता तपासण्याची यंत्रणा ठप्प, बाजार समित्यांतील दलाली आणि मुळात शेतीला उद्योग म्हणून मान्यता न देण्याचं अपप्रवृत्ती, हे सारे प्रश्न कोणाच्या अजेंड्यावर आहेत? कोण आहे जो म्हणतो, शेतकऱ्याचं जीवन सन्मानाचं व्हावं?शासन म्हणतं योजना सुरू आहेत, पण योजना सुरू असूनही आत्महत्या थांबत नाहीत, याचा अर्थ त्या योजना केवळ कागदावरच्या आहेत. आज प्रत्येक जिल्ह्यात एक अश्रू आहे, प्रत्येक गावात एक प्रश्न आहे, आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात एक आशा आहे - कदाचित कोणी तरी त्यांच्या बाजूने पेटेल! आणि आता त्या आशेचा रंग आहे, मशाल.

या मशाली सरकारच्या मौनाच्या काळोखात एक जागं करणारा उजेड आहेत. ज्या घरासमोर त्या पेटल्या, त्या मंत्र्यांच्या कानांवर फक्त शब्द नाही, जळणाऱ्या भावनांचा धूर पोहोचतोय. त्यांना जर अजूनही 'हे एक क्षणिक आंदोलन आहे' असं वाटत असेल, तर त्यांनी इतिहासात डोकावावं. प्रत्येक मोठ्या उठावाची सुरुवात अशीच झाली आहे, एखाद्या पेटलेल्या मशालीने. आणि म्हणूनच हे आंदोलन भूतकाळ नव्हे, तर भविष्य घडवणारं ठरू शकतं.शासन जर आता तरी सजग झालं नाही, तर ही मशाल जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये पोहोचेल. गावाकडं वीज नसली तरी, मशाल असेल. पाणी नसले तरी, मशाल असेल. सरकार नसल्यासारखं वागत असेल, तरी शेतकऱ्याच्या मनात मात्र मशाल पेटलेली असेल. कारण त्याला आता जगायचं आहे,सन्मानाने. त्याला जगवायचं आहे शेतीला, मातीला आणि देशाला.

ही मशाल फक्त विरोध नव्हे, ही संधी आहे,शासनासाठी सुधारणेची, आणि समाजासाठी ऐकण्याची. हे सरकार जर खरी लोकशाही मानत असेल, तर त्याने या मशालींची भीती बाळगू नये, तर त्या मशालींमधील ज्वालामुखीच्या उष्णतेत स्वतःचं अपयश शोधावं. कारण हे अपयश केवळ राजकीय नाही, ते नैतिकही आहे.शेवटी, ही मशाल कुणाच्या विरोधात नाही, ती शोषणाच्या विरोधात आहे. ती अराजकता निर्माण करण्यासाठी नाही, ती सुजाण समाजमन जागं करण्यासाठी आहे. आणि म्हणूनच ही मशाल केवळ प्रकाश देणार नाही, ती व्यवस्थेच्या अंधाराला भस्म करणार आहे.

**- संपादक**
**आशिष मारोतराव घुमे**
**९०११७०८८४०**

# फिस्कुटी येथे नि:शुल्क आरोग्य शिबिर संपन्न
## २०० रुग्णांची तपासणी; तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

**मूल । प्रतिनिधी**

गॉस्पल इंडिया मिनिस्ट्रीज, चंद्रपूर आणि टाटा कॅन्सर केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी फिस्कुटी येथील ग्रामपंचायत पटांगणात भव्य नि:शुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.सामान्य जनतेला आरोग्यसेवा मिळावी यासाठी गॉस्पल इंडिया मिनिस्ट्रीजचे संस्थापक-सचिव डॉ. अमोल परागे यांच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण २०० रुग्णांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली.शिबिरामध्ये प्रामुख्याने रक्ततपासणी, साखर (शुगर), रक्तदाब (ब्लड प्रेशर), तोंडाचे आजार, थायरॉईड, सिकलसेल, किडनीविषयक आजार, कॅन्सर तपासणी आणि स्त्रियांचे मासिक पाळीशी संबंधित समस्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन फिस्कुटी गावाचे सरपंच नितीन गुरनुळे, डॉ. आशिष बारब्दे व संस्थेच्या व्यवस्थापिका ओमना परागे यांच्या हस्ते करण्यात आले.




संस्थेच्या उद्दिष्टांविषयी माहिती देताना ओमना परागे यांनी सेवेच्या माध्यमातून समाजात ऐक्यता आणि बंधुभाव निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे, असे सांगितले. आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना डॉ. आशिष बारब्दे यांनी विविध रोगांपासून बचावासाठी जनजागृती केली.आरोग्य तपासणीसाठी टाटा कॅन्सर केअर फाउंडेशनची टीम उपस्थित होती. त्यात डॉ. आशिष बारब्दे, डॉ. ट्विंकल धेंगळे, सुरज साळुंके, नताशा देवघरे, वैष्णवी सहारे, ब्रदर रक्षक कोसणकर, सिस्टर वर्षा कोडापे, सिस्टर मर्सीस्टेला गजर यांचा समावेश होता.तसेच, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत फिस्कुटीतील महिला कार्यकर्त्या ईद्रायणी जेंगठे, निता चौधरी, रागिणी शेंडे, आशा सेविका भावना गणवीर, अविता रस्से, चेतना पलिकोडावार यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.कार्यक्रमास ग्रामपंचायतचे सभासद व कर्मचारी,समिता दुपारे, शामराव कडाम, चंद्रकांत जेंगठे, आकाश जेंगठे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राकेश कोडापे यांनी केले.

# ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त काँग्रेसतर्फे अभिवादन मान्यवरांना ‘शेतकऱ्यांचा असूड’ पुस्तक भेट

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्हा काँग्रेस कमिटी अंतर्गत छत्रपती शिव-शाहू-फुले-आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आमदार सुरेशराव वरपूडकर, शहर जिल्हाध्यक्ष नदिमभाई इनामदार, भगवानदादा वाघमारे, मुंजाभाऊ गायकवाड, सुहास पंडित, शजि अहमद खान, दिगंबर खरवडे, अंगद सोगे, श्रीराम जाधव,



वैजनाथ देवकते, राम कुऱ्हे पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.जयंती उत्सव समितीच्या वतीने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव आणि आमदार राहुल पाटील यांचा ‘शेतकऱ्यांचा असूड’ या महात्मा फुले लिखित पुस्तकाद्वारे सत्कार करण्यात आला.

# कडब्याच्या गंजीला आग शेतकऱ्याचे नुकसान

## शेतकऱ्याची शासनाकडे नुकसानभरपाईची मागणी



छगन राऊत यांच्या कडब्याच्या गंजीला लागलेली आग विझवताना शेतकरी.

**सोलापूर । प्रतिनिधी**

पांडे शेलगाव रस्त्यावरील छगन राऊत यांच्या वस्तीवर बुधवार, ९ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजताच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत अंदाजे दीड ते दोन हजार कडब्या जळून खाक झाल्या. वाढत्या उष्णतेमुळे कडब्याच्या गंजीला अचानक लागलेली ही आग पाहून छगन राऊत यांनी आरडाओरड केली. धुराचे लोट पाहून त्यांनी गावातील लोकांना आणि वस्तीवरील नागरिकांना मदतीसाठी बोलावले.

गावकऱ्यांच्या तत्परतेमुळे मोटारच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र तोपर्यंत संपूर्ण कडबा भस्मसात झाला होता. गंजीजवळच छगन राऊत यांचे घर, जनावरे आणि एक ट्रॅक्टर उभे होते. आग लागल्याची चाहूल लागताच गावकऱ्यांनी जीव धोक्यात घालून जनावरांना बाहेर काढले व ट्रॅक्टर सुरक्षित ठिकाणी हलवला. त्यांच्या या धाडसी कृतीमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी राऊत आणि गावकऱ्यांकडून केली जात आहे.

# सिंदी (रेल्वे) शहरात दर चार दिवसांनी पाणीपुरवठा; नगर परिषदेकडून दोन टँकर सुरु

## उन्हाळ्यात वाढलेल्या मागणीनुसार आ.समीर कुणावार यांच्या सूचनेनुसार उपाययोजना

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

सिंदी (रेल्वे) शहरात उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची मागणी वाढली आहे. त्यातच वादळी व अवकाळी पावसामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे नगर परिषदेला पाणी वितरणाच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. सध्या नगर परिषदेकडून दर चार दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

शहरातील काही भागांतून पाणी वितरणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आमदार समीर कुणावार यांनी तातडीने योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश नगर परिषदेला दिले. त्यानुसार, तात्काळ उपाययोजना करत नगर परिषदेकडून दोन पाण्याचे टँकर शहरात सुरू करण्यात आले असून, आवश्यकता भासल्यास टँकरची संख्या वाढवण्यात येईल, असेही प्रशासनाने सांगितले आहे.नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा व समजूतदारपणे सहकार्य करावे, असे आवाहन नगर परिषद सिंदी (रेल्वे) मार्फत करण्यात आले आहे.



# कांद्याच्या भरघोस उत्पादना साठी शेतकऱ्यांचा सन्मान

## प्रल्हाद मेहेर यांचा पत्नीसमवेत गौरव



कांदा बागायतदार प्रल्हाद मेहेर यांचा पत्नीसमवेत मान्यवरांच्या हस्ते सन्मान करताना.

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील पांडे परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी उत्कृष्ट दर्जा व भरघोस उत्पादन घेत शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केलेल्या ‘कलश सिड्स’ कंपनीकडून प्रत्यक्ष पाहणी व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पांडे येथील मेहर फार्महाऊस येथे पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कलश सिड्सचे एरिया बिझनेस मॅनेजर प्रमोद सुरवसे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भिमराव शिरसागर, बाळासाहेब मेहेर, गहिनीनाथ दुधे, दादासाहेब मेहेर, भरत कुलकर्णी, माजी सरपंच गोरख आनारसे, तसेच भाऊसाहेब आडसुळ (म्हसेवाडी) व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी उत्कृष्ट कांदा उत्पादन घेतलेल्या व गुणवत्तापूर्ण बियाण्याचा वापर करून इतरांसाठी आदर्श ठरलेल्या शेतकरी प्रल्हाद मेहेर यांचा पत्नीसमवेत सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत पांडे, म्हसेवाडी येथील अन्य कांदा बागायतदारांचाही गौरव करण्यात आला.कार्यक्रमात वैभव प्रभणीकर यांनी कांदा वाणांची निवड, उगमक्षमता, टिंबक व बेड पद्धती, फवारणी वेळ, खत व्यवस्थापन अशा विविध बाबींची सविस्तर माहिती दिली. याशिवाय मुळा, कोबी, बिट, कलिंगड, खरबूज, मिरची इत्यादी पिकांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.या सन्मान सोहळ्याला बळीराम आवसारे, ज्ञानदेव शिरसागर, दीपक ननवरे, रमेश घोरपडे, दत्तात्रय गोसावी, सुशेन पाटील, सुरज भगरे, शिवाजी दुधे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटस येथे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## स्व.मंगेश दोशी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त उपक्रमाचे आयोजन

**दौंड । योगेश राऊत**

येथील माजी उपसरपंच स्वर्गीय मंगेश दोशी यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त श्री नागेश्वर फाउंडेशन आणि मंगेश शेठ दोशी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १० एप्रिल २०२५ रोजी पार पडलेल्या या शिबिरात तब्बल ६१ रक्तदात्यांनी सहभाग घेतला.या उपक्रमात युवकांचा विशेष सहभाग जाणवला, तर व्यापारी वर्ग आणि गावातील नागरिकांनीही पुढाकार घेत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

कार्यक्रमाचे उद्घाटन दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी स्व. मंगेश दोशी यांच्या समाजकार्याचा गौरव करताना रक्तदान हेच खरे जीवनदान असल्याचे प्रतिपादन केले. फाउंडेशनचे अध्यक्ष शिवाजी बापू ढमाले यांनी या शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करत, भविष्यातही असे शिबिर नियमितपणे आयोजित करून अधिकाधिक रुग्णांना मदत करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी सत्वशील शितोळे, गुरुवर्य तात्या महाराज ढमाले, दिलीप हंडाळ, राहुल रणदिवे, सागर पाटील, राहुल आव्हाड, मिलिंद दोशी, नितीन देशमुख, संतोष वरघडे, राजेंद्र पानसरे, संभाजी खडके, लहूचंद खाडे, पोपट गायकवाड, गणेश रंधवे, समाधान शिंदे, श्रीकांत शितोळे, शहाजी भागवत, स्वप्निल भागवत, तसेच दौंड तालुक्यातील विविध राजकीय व सामाजिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंडळाच्या वतीने सर्व रक्तदात्यांचे आभार मानण्यात आले.



# चैत्र पौर्णिमेनिमित्त कावड मित्र मंडळ धाडणे गावातर्फे भंडारा

## ६००० हून अधिक भाविकांनी घेतला लाभ

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील धाडणे (राजधानी) गावातील सप्तशृंगी देवी कावड मित्र मंडळातर्फे चैत्र पौर्णिमेनिमित्त पिंपळनेर-साक्री रस्त्यावरील सप्तशृंगी देवी मंदिर परिसरात भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. या भंडाऱ्याचा सुमारे सहा हजारांहून अधिक भाविकांनी लाभ घेतला.



गावातील तसेच परिसरातील नागरिकांनी उत्साहात सहभाग घेत या धार्मिक सोहळ्याची रंगत वाढवली. यावेळी देवी मंदिराशेजारी रात्री जागरणाचा कार्यक्रम पार पडला. भजनी मंडळाच्या भक्तिरसपूर्ण गायनाने परिसर भक्तिमय झाला होता. गेल्या दोन दिवसांपासून संपूर्ण परिसर भगवेमय वातावरणात न्हालेला दिसत होता.या कार्यक्रमानिमित्त साखरी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंजुळाताई गावित यांनीही देवीचे दर्शन घेऊन उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. भंडाऱ्याचे आयोजन सुयोग्य नियोजन आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. पुरुषांसह महिलांचाही मोठ्या संख्येने सहभाग लाभला.

# ज्यांना साधी दहिगाव योजना चालवता येईना, ते कारखाना काय चालवणार?

## विलासकाका राऊत यांचा सत्ताधाऱ्यांवर रोखठोक टोला

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी जीवनरेषा ठरलेली दहिगाव उपसा सिंचन योजना सध्या उन्हाळी आवर्तनात असूनही, टेल भागातील शेतकऱ्यांना अद्याप पाण्याचा थेंबही मिळालेला नाही. ही दुर्दशा पाहता ज्यांना साधी दहिगाव योजना नीट चालवता येत नाही, ते कारखाना काय चालवणार? अशा शब्दांत आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक विलासकाका राऊत यांनी विद्यमान आमदार नारायण पाटील व त्यांच्या गटावर कडवट टीका केली आहे.



राऊत पुढे म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक काळात नियोजनबद्ध पद्धतीने पाणी वितरण झाले. त्यामुळे १०० दिवसांचे उन्हाळी आवर्तन यशस्वी झाले आणि शेतकऱ्यांनी पाईपलाइन, शेततळी, केळी, भाजीपाला, ऊस व फळबागांसाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली. पण आताच्या नियोजनशून्य कारभारामुळे शेकडो कोटींचं नुकसान या २४ गावांतील शेतकऱ्यांना सहन करावं लागणार आहे.या योजनेत 'टेल टू हेड' पद्धतीने पाणी दिले जाण्याचा नियम असताना, तीन आठवडे झाले तरी घोटीसह इतर अनेक गावे अजूनही प्रतीक्षेत आहेत. पाटबंधारे विभागाने दिलेल्या लेखी आश्वासनावर ७ एप्रिल रोजीचा रस्ता रोको आंदोलन सरपंच रवींद्र वळेकर यांच्या नेतृत्वाखाली मागे घेण्यात आला होता. परंतु परिस्थितीत सुधारणा न झाल्याने आता पुन्हा एकदा रोष उफाळून आला आहे.विलासकाका राऊत यांनी स्पष्ट इशारा दिला की, १४ एप्रिलपर्यंत पाणी न आल्यास १५ एप्रिल रोजी टेल भागातील शेतकऱ्यांसह तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल. यासंदर्भात निवेदन तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन व पाटबंधारे विभागाला सादर करण्यात आले आहे.

# गंगाखेडमध्ये महात्मा फुले जयंतीनिमित्त उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा सत्कार

## चार्वाक दर्शन मंचतर्फे डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन गौरव

**गंगाखेड । प्रतिनिधी**

चार्वाक दर्शन मंच गंगाखेडच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, गंगाखेड येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने राज्यातील मोठ्या शस्त्रक्रियांच्या यशस्वी कामगिरीमुळे द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि तंत्रज्ञ यांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात पुष्पगुच्छ, शाल व महात्मा फुले यांची पुस्तके भेट देऊन गौरव करण्यात आला.सत्कारमूर्तींमध्ये डॉ. हेमंत मुंढे, डॉ. दीपक नागरगोजे, डॉ. पी. आर. चट्टे, डॉ. केशव मुंढे आणि डॉ. हानवते, तसेच रुग्णालयातील सहकारी कर्मचारी व परिचारिका यांचा समावेश होता.या प्रसंगी व्हॉईस ऑफ मिडीयाच्या वतीने डॉ. हेमंत मुंढे यांना विशेष स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.कार्यक्रमास कॉ. ओंकार पवार, सुरेश इखे, रमेश पवार, सुंदर जाधव, संदीप जाधव, अन्वरभाई लिंबेकर, यशवंत सोडगीर, अरुण गिराम, आत्माराम मुठाळ, कृष्णा गायकवाड, शिवाजी कांबळे, गुनवंत कांबळे, सिद्धोधन भालेराव, डॉ. शैलेश कदम, अंकुश कांबळे, रोहिदास लांडगे, सुभाष शिंदे, विजय धोंडगे आदी चार्वाक दर्शन मंच व व्हॉईस ऑफ मिडीया प्रतिनिधी उपस्थित होते.

# अपघातात कुटुंब गमावलेल्या वैद्य परिवाराला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचे सांत्वन

**वर्धा । प्रतिनिधी**

हिंगणघाट तालुक्यातील भीषण अपघातात पोलिस हवालदार प्रशांत वैद्य यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसर शोकमग्न असताना जिल्ह्याचे पालकमंत्री व गृहमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी वैद्य कुटुंबाच्या घरी भेट देऊन दुःखद घटनेबाबत कुटुंबीयांचे सांत्वन केले. वडनेर पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस हवालदार प्रशांत वैद्य रामनवमीच्या निमित्ताने आपल्या मूळगावी मांडगाव येथे कुटुंबासह गेले होते. परतीच्या प्रवासात त्यांच्या कारसमोर अचानक वराह आल्यामुळे गाडी टँकरला धडकली. या भीषण अपघातात प्रशांत वैद्य, त्यांची पत्नी प्रियंका, मुलगा प्रियांश आणि मुलगी माही उर्फ मनश्री यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे.घटनेनंतर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी बॅचलर रोड, जुनी स्टेट बँक कॉलनी येथील वैद्य कुटुंबीयांच्या घरी भेट दिली. त्यांनी कुटुंबीयांना धीर देत शासकीय पातळीवर मदतीचे आश्वासन दिले.यावेळी पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. सागर कवडे, सुनिल गफाट, नगरसेवक निलेश किटे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.



# फेटरी येथील सरकारी दवाखाना कायम बंद; ग्रामस्थ हैराण

## लहरी व मर्जीने चालतो कारभार, जबाबदारीची उणीव

**नागपूर । अनिकेत उमरेडकर**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील फेटरी गावातील सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अनेक वर्षांपासून निष्क्रिय असून, दवाखाना सुरू आहे की बंद, याचा नेमच उरलेला नाही. मुख्य रस्त्यावर वसलेला हा दवाखाना बाहेरून पाहिल्यास सुरू असल्याचा भास निर्माण होतो. मात्र, प्रत्यक्षात तो नेहमीच कुलूपबंद असतो.




गावातील नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही. दवाखान्यात डॉक्टर आहेत की नाही, याचीही स्पष्टता नाही. त्यामुळे अपघात किंवा आजारपणात नागरिकांना कळमेश्वर किंवा नागपूर गाठावे लागते, ही अत्यंत चिंतेची बाब आहे.दवाखान्याच्या परिसरातील नागरिकांनीही सांगितले की, कधी उघडतो तर कधी बंद असतो, त्यामुळे तो आहे की नाही, हेच समजत नाही. जर उपयोगात नसणार असेल, तर तो बंद करून टाकावा.

या संदर्भात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कळमेश्वर तालुकाप्रमुख यांनी दहा वेळा या दवाखान्याला भेट दिली असून, त्यांनीही याठिकाणी होणाऱ्या अनागोंदी कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. दादा, याचा काही भरोसा नाही, कधी उघडतो, कधी बंद, काही सांगता येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.स्थानिक ग्रामपंचायतीनेही या विषयात दुर्लक्ष केल्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या मते, जर दवाखाना सुरू ठेवायचा नसेल, तर तो अधिकृतपणे बंद करून इतर उपाययोजना कराव्यात.

### मलांजनच्या पांझरा नदीत साठवण बंधाऱ्याचे भूमिपूजन

# पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला दिलासा आ.मंजुळाताई गावित यांच्या हस्ते भूमिपूजन

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील मलांजन गावात पांझरा नदीवर साठवण बंधारा उभारण्यासाठी १७२.८८ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, याचे भूमिपूजन साखरी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंजुळाताई गावित यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यामुळे गावातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याची आशा निर्माण झाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून मलांजन ग्रामपंचायतीकडून साठवण बंधाऱ्यासाठी पाठपुरावा सुरू होता. मात्र तांत्रिक अडचणीमुळे प्रकल्प रखडलेला होता. स्थानिक सरपंच, सदस्य आणि नागरिकांच्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत आमदार गावित व शिवसेना जिल्हाप्रमुख तुळशीराम गावित यांनी हा निधी मंजूर करून घेतला.



या भूमिपूजनप्रसंगी आमदार गावित म्हणाल्या, २०२३-२४ मध्ये साक्री तालुक्यात एकूण १४ साठवण बंधाऱ्यांना मंजुरी मिळाली असून, यामध्ये देगाव, ढोलीपाडा, नवापाडा, शेंवगे, कोकणगाव, बोडकी खडी, लंगडवाड, पारगाव, रूणबळी, डांग शिरवाडे व मलांजन यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे पाण्याच्या समस्या दूर होणार आहेत.कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य गोकूळसिंह परदेशी, युवा सेनेचे सागर गावित, शिवसेना तालुकाप्रमुख पंकज मराठे, साहेबराव गांगुर्डे, मलांजनच्या सरपंच शितल सोनवणे, उपसरपंच बबन पानपाटील, विनायक अकलाडे, जितेंद्र बिरारी, पंकज भामरे, अजय सोनवणे (भाडणे), मा. ऋषिकेश मराठे, नगरसेवक राहुल भोसले, जगदीश अकलाडे, अभय शिंदे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध लेआउटमुळे रस्त्याचे काम ठप्प; आ.बकाने यांनी घेतली तातडीने दखल

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी विधानसभा मतदारसंघातील ३८ कोटी रुपयांच्या केंद्रीय रस्ते विकास निधीअंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाला आर्वी (छोटी) येथील एका अवैध लेआउटधारकाने अडथळा निर्माण केला. ही बाब समजताच आमदार राजेश बकाने यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि संबंधित अधिकार्यांची तातडीने बैठक घेऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

देवळी विधानसभा क्षेत्रातील चिंचोली वाघोली, इंझाळा, पेरणवाडी, आर्वी, वडनेर या भागांतील रस्त्यांचे काम केंद्रीय निधीतून सुरू आहे. परंतु आर्वी (छोटी) येथे एका अवैध लेआउटधारकाने या रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण केल्याने काम थांबवावे लागले. आमदार बकाने यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन रस्त्याच्या कामाची पाहणी केली.पाहणीत त्यांनी लक्षात आणले की, संबंधित लेआउट शासकीय नियमानुसार मंजूर न होता तयार करण्यात आले आहे. विद्युतीकरण, सांडपाणी व्यवस्थेसारख्या मूलभूत सुविधा नसतानाही प्लॉट विक्री झाल्याचे समोर आले.ही परवानगी देणारे संबंधित अधिकारीही जबाबदार असून त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत बकाने यांनी व्यक्त केले. त्यांनी यासंदर्भात तात्काळ बैठक बोलावून संबंधित अधिकाऱ्यांना रस्त्याचे काम त्वरित सुरू करण्याच्या सूचना दिल्या.या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंभोरे, हिंगणघाटचे नगर रचनाकार सावकारे, वर्ध्याचे नगररचनाकार गेडाम, नायब तहसीलदार भलावी, भूमी अभिलेख उपअधीक्षक तांबडे, महावितरणचे चितावार तसेच स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.



# अमित शहा यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ना.भरत शेठ गोगावलेंच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

## कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी यंत्रणांना मंत्री गोगावले यांचे स्पष्ट निर्देश

**रायगड । प्रतिनिधी**
शिवपुण्यतिथीनिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा १२ एप्रिल रोजी किल्ले रायगड दौऱ्यावर येणार आहेत. या पार्श्वभूमीवर बुधवारी महाड येथील शासकीय विश्रामगृहात राज्याचे रोजगार हमी योजनांचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची आढावा बैठक पार पडली.या बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महाडचे प्रभारी प्रांताधिकारी राजकुमार सानप, तहसीलदार महेश शितोळे, गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील यांच्यासह केंद्रीय पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, वन विभाग, पोलीस, आरोग्य, आरटीओ, नगरपरिषद, पाणीपुरवठा, रोपवे प्रशासन व इतर शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री गोगावले यांनी सांगितले की, हा कार्यक्रम आपल्याच जिल्ह्यात आणि माझ्या मतदारसंघात होत असून, तो अत्यंत सुनियोजित आणि शिस्तबद्ध व्हावा, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांनी रायगडच्या पायथ्यापासून ते गडावरील कार्यक्रमाच्या सर्व नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला.बैठकीत वाहनतळ व्यवस्थापन, एसटी गाड्यांचे नियोजन, वीज व पाण्याचा पुरवठा, रोपवे वेळापत्रक, आरोग्य सुविधा, तात्पुरती हेलिपॅड निर्मिती, रस्ते व वाहतुकीची सुविधा अशा विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. मंत्री गोगावले यांनी प्रत्येक विभागाने आपले काम वेळेत पूर्ण करावे आणि कोणत्याही अडचणीस तातडीने उपाययोजना कराव्यात, असे स्पष्ट निर्देश बैठकीत दिले.



## चंद्रपूरात 'जेल भरो आंदोलन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

# ओबीसी जनगणना,ईव्हीएम,महापुरुषांचा अपमान; महाबोधी महाविहार विषयांवर निषेध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
बुधवार, दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग (ओबीसी) मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क व इतर सहयोगी संघटनांच्या वतीने जोरदार घोषणाबाजीसह धरणे आंदोलन करून नंतर 'जेल भरो आंदोलन' करण्यात आले.



सदर आंदोलन ईव्हीएम मशीनच्या विरोधात आणि बॅलेट पेपरच्या समर्थनार्थ, ओबीसीच्या जाती आधारित जनगणना न झाल्याच्या निषेधार्थ, आरएसएस व भाजपकडून होत असलेल्या महापुरुषांचा अपमान तसेच महाबोधी महाविहारवर ब्राह्मणांनी केलेल्या कथित कब्जाच्या विरोधात आयोजित करण्यात आले होते. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना शिष्टमंडळाच्या माध्यमातून सादर करण्यात आले.या आंदोलनाचे नेतृत्व मा. दिनेश शाक्य (भारत मुक्ती मोर्चा), मा. आनंद गावंडे (प्रभारी बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क), मा. के. एस. पडवेकर (जिल्हा प्रभारी बहुजन क्रांती मोर्चा), मा. विशाल भसारकर (बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क), मा. विठ्ठल एडमे (राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद), आणि जयकुमार रामटेके (बहुजन मुक्ती पार्टी) यांनी केले.यावेळी आंदोलनात प्रा. सूचिता खोब्रागडे, प्रतिमा जुलमे, डॉ. ज्योत्स्ना भागवत, सुशीला तेलमोरे, सुरेखा लभाने, रत्नमाला नंदागवली, लता नरंजे, लता शिंगाडे, भारती खोब्रागडे, ज्योती वाळके, पुणेकर, शंकुतला भगत, पाटील, शंकर देवगडे, चंद्रमणी शंभरकर, अरविंद अंबुलकर, नामदेव वाढई, योगेश गेडाम, डॉ. प्रकाश रामटेके, अभिषेक भसारकर तसेच विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंदोलनामुळे परिसरात चांगलीच खळबळ निर्माण झाली असून, प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वर्ध्यातील 'डबला' अटकेत; उत्तर प्रदेशातून अटक, सात मोबाईल जप्त



**वर्धा । प्रतिनिधी**
वर्धा शहरातील मोबाईल चोरी प्रकरणातील अट्टल चोरटा इमरान उर्फ डबला वल्द नजीर खान याला उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई करत त्याच्याकडून चोरीचे सात मोबाईल हस्तगत केले आहेत.

शहर पोलिस ठाण्यांत दाखल मोबाईल चोरीच्या गुन्ह्यातील संशयित इमरान ऊर्फ डबला हा सराईत चोरटा असून, तो वर्ध्यातील गौरव सेलूकर यांच्या 'गौरव सेल्स' नावाच्या मोबाईल दुकानातून नवीन मोबाईल चोरी करून पसार झाला होता. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेने सुरू ठेवला होता. तांत्रिक विश्लेषण व माहितीच्या आधारे पोलिसांनी डबला याचा माग काढत उत्तर प्रदेशात त्याचा ठावठिकाणा शोधून काढला आणि यशस्वी सापळा रचून त्याला अटक केली.पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले एकूण सात मोबाईल जप्त केले असून पुढील तपास सुरू आहे. डबला याच्या विरोधात यापूर्वीही अनेक चोरीच्या घटना नोंदवलेल्या असल्याची माहिती पोलिसांनी दिली.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असून, अधिक तपास जअहर पोलिस करत आहेत.

## वर्ध्यात वाळूऐवजी मासळीवर सुटले ट्रॅक्टर; पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**देवळी । प्रतिनिधी**
वर्धा जिल्ह्यातील आंजी (अंदोरी) परिसरात उपविभागीय पोलिस पथकाने बुधवारी दोन वाळू भरलेले ट्रॅक्टर पकडले होते. मात्र, ट्रॅक्टर मालकांनी मासळी आणि मद्याचे आमिष दिल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर सोडल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

आंजी (अंदोरी) येथील पिंपळखुटा घाटात बेकायदेशीर वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पोलिसांनी पकडले होते. ही कारवाई उपविभागीय पोलिस पथकातील संदीप आणि त्यांच्या साथीदाराने केली होती. ट्रॅक्टर 'रोहन-पवन' या व्यक्तींच्या मालकीचे असल्याची जोरदार चर्चा आहे.

मात्र या कारवाईनंतर ट्रॅक्टर मालकांनी पोलिस कर्मचाऱ्यांना मासळी आणि मद्याचे आमिष दिले. त्यानंतर पोलिसांनी ट्रॅक्टरमधील वाळू नदीपात्रात उतरवण्यास सांगितले आणि ट्रॅक्टर सोडून दिले.या प्रकरणातील सर्वजण नंतर यवतमाळ जिल्ह्यातील एका बारमध्ये एकत्रितपणे मासळी पार्टी करताना दिसल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे पोलिसांच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होण्याची शक्यता आहे.या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# स्वप्नझेप अकॅडमी सारखं व्यासपीठ असणं ही अभिमानाची गोष्ट-वैशाली लांजेवार

## स्वप्नझेप अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**
प्रणय बांगरेङ्गनागभीड तालुक्यातील 'राईस सिटी' म्हणून ओळख असलेल्या तळोधी (बा.) या गावात विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या ''स्वप्नझेप अकॅडमी'' या संस्थेच्या स्वप्नझेप अभ्यासिकाचा शुभारंभ दि. ६ एप्रिल २०२५ रोजी रविवारी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, महामानवांच्या प्रतिमेच्या पूजनाने आणि अभ्यासिकेच्या उद्घाटनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन भेंडाळे यांनी करत संस्थेची २०१८ पासूनची वाटचाल विशद केली. त्यांनी सांगितले की, ''स्वप्नझेप ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सातत्याने कार्यरत आहे आणि भविष्यातही असेच उपक्रम राबवले जातील.कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून उपस्थित असलेल्या कवयित्री व समाजसेविका वैशाली लांजेवार यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले, ''स्वप्नांनाच ध्येय बनवून त्यासाठी मेहनत घेतली तर यश नक्की मिळते. या प्रवासात स्वप्नझेप अभ्यासिका हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना उंच भरारी घेण्यास मदत करेल.कार्यक्रमाचे अध्यक्ष अजयभाऊ बारस्कर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मंत्र देताना म्हणाले, ''मन के जीते जीत है, मन के हारे हार. हार गए जो बिन लडे, उन पर है धिक्कार.'' यशासाठी मानसिक निर्धार व सातत्य महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.स्वप्नझेप अकॅडमीचे मार्गदर्शक पराग मस्के, विकास राऊत आणि नितीन भेंडाळे हे तिघेही संस्थेच्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहेत. आजवर या अकॅडमीच्या माध्यमातून ३५ विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत झाले असून, गावकऱ्यांच्या कौतुकास पात्र ठरले आहेत.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रोशन मडावी, बंडूभाऊ बारसागडे, चंदूजी निकोडे, विक्रम चुटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गुरनुले यांनी केले तर आभार प्रदर्शन पराग मस्के यांनी केले.या वेळी विद्यार्थी, पालक आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वरोरा एस.टी. डेपो परिसरात लागलेल्या आगीवर फायर ब्रिगेडच्या तत्परतेने नियंत्रण

## डिझेल पंपाच्या अवघ्या काही फुटांवर आगीचा प्रसार-मोठा अनर्थ टळला

**वरोरा । प्रतिनिधी**
वरोरा एस.टी. डेपो परिसरात शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. वनविभागाच्या बागेतील कचरा जाळत असताना ही आग लागल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट झाले. आगीच्या ठिकाणापासून अवघ्या ३० फूट अंतरावर डिझेल पंप असल्याने परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र, वरोरा नगर परिषद व साई वर्धा पॉवर कंपनीच्या अग्निशमन पथकांनी तातडीने हस्तक्षेप करून आग आटोक्यात आणली.

नगर परिषद अग्निशमन विभागाचे अधिकारी भूषण सालवटकर यांच्या मार्गदर्शनाखाली फायर ब्रिगेडने घटनास्थळी दाखल होत आग विझवण्याचे काम सुरू केले. साई वर्धा पॉवर कंपनीचे सेफ्टी इन्चार्ज वैभव खारकर यांनीही त्यांच्या अग्निशमन वाहनाची मदत दिली. समन्वयाने केलेल्या प्रयत्नांमुळे आग लवकर नियंत्रणात आली. घटनास्थळी युवासेना जिल्हाप्रमुख आलेख रट्टे यांच्या सूचनेवरून तालुकाप्रमुख प्रणव पारेलवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत युवासेना तालुका सचिव रितिक जाधव, प्रतीक जाधव, संकेत वाणी, अमित भाऊ हे कार्यकर्तेही उपस्थित होते. या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी मदतीसाठी पुढाकार घेतला.तसेच, घटनास्थळी आदिवासी टायगर सेना तालुकाध्यक्ष संजय फुटाणे, मनसे सैनिक आनंद गेडाम, जगदीश भोयर, सारंग नखाते, प्रदीप रंगारी यांच्यासह रा. प. म. चे कर्मचारीही उपस्थित होते. या सर्वांनी मदतीचे प्रयत्न केले.फायर ब्रिगेडच्या तातडीच्या प्रतिसादामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली असून, याबाबत उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .